पुणे महानगरपालिका

*** स्थायी समिती ***

कार्यपत्रिका क्रमांक ५३

स्थायी समितीची साप्ताहिक सभा **गुरुवार दि. २८/२/२००८** रोजी सकाळी ११:३० (साडे अकरा) वाजता **म.ज्योतिबा फुले सभागृहात** (स्थायी समिती सभागृहात) भरेल.

सदर सभेत खालील विषयांचा विचार होईल.

**वृत्तांत कायम करणे.**

**मा.सभासदांचे प्रस्ताव**

**विषय क्र. १८९७**

मा.विजय मारटकर व मा.दिलिप उंबरकर यांचे दि. २०/२/२००८ चे पत्र.

बालगंधर्व रंगमंदिर येथील स्वच्छता ठेका १ वर्षासाठी दिशा एजन्सीला देण्यात आला होता. सदर ठेक्याची मुदत फेब्रुवारी २००८ ला संपणार असल्याने मार्च २००८ पासून पुढील तीन वर्षाकरीता सध्याचे दरामध्ये २०% वाढ देऊन दिशा एजन्सी यांचा ठेका पुढे चालु ठेवण्यात यावा.

**विषय क्र. १८९८**

मा.दिलिप उंबरकर व मा.सुनिल कांबळे यांचे दि. २०/२/२००८ चे पत्र.

सौ.कल्पना मारुती मोहोळ, राहणार कोथरुड, पुणे यांचा मुलगा उमेश मारुती मोहोळ, वय वर्षे १६, पद्मश्री डॉ.विठ्ठलराव विखे पाटील सैनिक स्कूल, प्रवरानगर येथे ११ वी सायन्स शिकत आहे. ह्या शाळेतर्फे आणि टेबल सॉकर फेडरेशन ऑफ इंडिया ह्या क्रिडा संस्थेतर्फे चंदिगड येथे १ व २ जानेवारी २००८ ला झालेल्या राष्ट्रीय स्तरावरील स्पर्धेत निवड होऊन आता त्याला रशिया येथे खेळण्याची संधी मिळाली आहे. ही आंतरराष्ट्रीय स्पर्धा २२ मार्चला सुरु होऊन दहा दिवस चालणार आहे. सदर ठिकाणी जाण्यासाठी पालकांना एक लाख रुपये भरण्यास सांगितले आहे. वैयक्तिक पातळीवर एवढा एकदम खर्च उचलणे शक्य नसल्याने पुणे महानगरपालिकेतर्फे रक्कम रुपये एक लाख सौ.कल्पना मारुती मोहोळ यांना उपलब्ध करुन देण्यात यावेत.

**विषय क्र. १८९९**

मा.सौ.संगिता गायकवाड यांचे दि. २१/२/२००८ चे पत्र.

पुणे शहराचे भूतपुर्व महापौर गुरुवर्य बाबुरावजी जगताप यांचे सुपूत्र श्री.जयंतराव तथा दादासाहेब जगताप यांनी जनता शिक्षण संस्थेची स्थापना १९५२ साली केली. या संस्थेला नुकतीच ५५ वर्षे पूर्ण झाली आहेत. या संस्थेचे शहरात व जिल्ह्यात ११ हायस्कूल, ५ कनिष्ठ महाविद्यालय व एक वरिष्ठ महाविद्यालय आहे. पी.एम.टी.चे मा.चेअरमन धनाजीराव जाधव हे या संस्थेचे विद्यमान अध्यक्ष आहेत.

या संस्थेचे श्री शिवाजी विद्यामंदिर व कनिष्ठ महाविद्यालय, औंध गांव, पुणे ७ ही प्रशाला मुख्य वाहतुकीचे रस्त्यावर असल्याने जुनी इमारत वापरणे धोकादायक झाले आहे. अशा सुचना स्ट्रक्चरल डिझाईनर यांचेकडून दिलेल्या आहेत. ३००० स्थानिक मुलांचे दृष्टीने कोणताही अपघाती प्रसंग घडू नये अशी दक्षता घेणे आवश्यक आहे. जुन्या इमारतीला मोठ्या प्रमाणावर हादरे बसतात. ३००० विद्यार्थी येथे शिक्षण घेत असल्याने धोकादायक जुनी इमारत पाडून नविन अद्ययावत इमारत संस्थेला याच ठिकाणी बांधावयाची आहे. याकरीता एक वर्षाचे कालावधीसाठी शाळा कामकाज औंध येथेच करणे सोयीचे आहे. याकरीता औंध स.नं. १५३ व १५४ पार्ट पुणे महापालिकेच्या क्रिडांगणालगतच्या मोकळ्या जागेत २५ वर्गखोल्या या तात्पुरत्या ट्रान्झिट कॅम्प करणेस व मनपा शाळा क्र. ८७ इमारतीमधील ३ वर्गखोल्या या ऑफीस कामकाजासाठी वापर करणेस नाममात्र भाड्याने एक वर्ष कालावधीकरीता या संस्थेला देण्यात याव्यात.

Unregistered

औंध येथील सर्व मनपा शाळेचे विद्याथी वर्षानुवर्षे इयत्ता ७ वी नंतर याच प्रशालेत शिक्षण घेत आहेत. शैक्षणिक विशेष बाब म्हणून एक वर्ष कालावधीसाठी औंध येथील महापालिकेच्या मोकळ्या जागेत शाळेसाठी ट्रान्झिट कॅम्प करणे व ३ वर्गखोल्या वापरणे या कामासाठी मान्यता देण्यात यावी.

नविन इमारत एक वर्षात पूर्ण करुन पुन्हा मुळ जागी शाळेचे स्थलांतर संस्थेकडून करण्यात येईल व महापालिकेची ट्रान्झिट वर्ग खोल्यांसाठी दिलेली मोकळी जागा व शाळेच्या वर्ग खोल्या विनाअट संस्था रिक्त करील या अटीवर विषयांकित प्रस्तावास मान्यता द्यावी.

**विषय क्र. १९००**

मा.अविनाश जाधव, मा.मोहनसिंग राजपाल व मा.कर्णेगुरुजी यांचे दि. २१/२/२००८ चे पत्र.

कु.कृणाल राजेंद्र भोसले यांनी १२, १४, १७ वर्षाखालील वरिष्ठ गट राष्ट्रीय स्पर्धांमधून महाराष्ट्राचे प्रतिनिधीत्व करुन अनेक सुवर्ण, रौप्य व कांस्य पदके राष्ट्रीय विक्रमांसह मिळविली आहेत. तसेच महाराष्ट्र राज्य जलतरण संघटनेचा राज्यस्तरीय उत्कृष्ठ महिला खेळाडू चषक २००४ व पुणे जिल्हा क्रिडा संघटनेचा गुणवंत खेळाडू २००७ हा पुरस्कारही मिळविला आहे.

तसेच इस्लामाबाद–पाकिस्तान येथे झालेल्या खुल्या गटात दक्षिण आशियाई जलतरण स्पर्धेत भारतातर्फे सहभागी होऊन २०० मि.ब्रेस्ट स्ट्रोकमध्ये सुवर्ण पदक मिळविले आहे. माहे ऑक्टोंबर २००८ मध्ये पुण्यात होणाऱ्या राष्ट्रकुल युवा स्पर्धेच्या भारतीय जलतरण प्रशिक्षण शिबीरात निवड करण्यात आलेली आहे. प्रशिक्षणासाठी व तयारीसाठी कु.कृणाल राजेंद्र भोसले यांना अंदाजे रक्कम रुपये ५ लाखांची आवश्यकता आहे. (आहार, साधने, वैद्यकिय आहार, पोषक आहार तसेच प्रवास व राहण्याचा खर्च इत्यादीकरीता आर्थिक मदतीची आवश्यकता आहे.)

तरी कु.कृणाल राजेंद्र भोसले यांना सदर स्पर्धेच्या तयारीकरीता र.रुपये ५ लाख निधी उपलब्ध करुन देण्यात यावा.

**विषय क्र. १९०१**

मा.शंकर उर्फ बंडू केमसे व मा.दिलिप बराटे यांचे दि. २१/२/२००८ चे पत्र.

कु.चिन्मय किशोर आदमाने, राहणार डी–२५, इंदिराशंकर नगरी, कोथरुड हे ११ वी सायन्समध्ये डॉ.विठ्ठलराव विखेपाटील सैनिक स्कूल, प्रवरानगर येथे शिकत असून त्यांना शाळेतर्फे आणि टेबल सॉकर फेडरेशन ऑफ इंडिया या क्रिडा संस्थेतर्फे चंदिगड येथे १ व २ फेब्रुवारी २००८ रोजी राष्ट्रीय स्तरावर झालेल्या स्पर्धेत निवड होवून कु.चिन्मय यास रशिया येथे होणाऱ्या आंतरराष्ट्रीय स्पर्धेमध्ये खेळण्याची संधी मिळालेली आहे. त्यांची आर्थिक परिस्थिती अत्यंत बिकट आहे. तसेच कु.चिन्मय आदमाने यांच्या या कामगिरीमुळे पुणे शहराचे वैभवात भर पडणार आहे. .

तरी कु.चिन्मय आदमाने यास रक्कम रुपये १ लाखाचा निधी मंजूर करण्यात यावा.

**विषय क्र. १९०२**

मा.शंकर उर्फ बंडू केमसे व मा.अक्रुर कुदळे यांचे दि. २१/२/२००८ चे पत्र.

पौड रोड चांदणी चौक ते मनपा हद्द संपेपर्यंत म्हणजे रामनदी पूलापर्यंत बावधन हा रस्ता ताब्यात घेण्यात यावा.

**विषय क्र. १९०३**

मा.अनिल जाधव व मा.संजय नांदे यांचे दि. २१/२/२००८ चे पत्र.

वॉर्ड क्र. ११५ येथे सांस्कृतिक भवन बांधणे व मैदान तयार करणेकरीता र.रुपये २० लाखाचे वर्गीकरण खालीलप्रमाणे करण्यात यावे, ही विनंती.

Unregistered

| अर्थशिर्षक | कमी | अधिक |
|---|---|---|
| सन २००७–२००८ चे अंदाजपत्रक, | | |
| यादी क्र. एस–१२, पान क्र. २७९, अ.क्र. १८, शहरात विविध ठिकाणी व्यायामशाळा बांधणे | | |
| १) वॉर्ड क्र. ११५ तुळशीबाग कॉलनी येथे स्विमींग पूल व व्यायामशाळा बांधणे | १२ लाख | --- |
| यादी क्र. एस–२८, पान क्र. २८०, अ.क्र. ११, शहरातील विविध क्रिडांगणामध्ये विकास कामे करणे | | |
| २) वॉर्ड क्र. ११५ तुळशीबाग कॉलनी येथे जॉगिंग ट्रॅक व विरंगुळा केंद्र बांधणे | ८ लाख | --- |
| नविन सुचविलेले काम | | |
| वॉर्ड क्र. ११५ येथे सांस्कृतिक भवन बांधणे व मैदान तयार करणे | --- | २० लाख |

**विषय क्र. १९०४**

मा.सौ.सुलोचना तुपे यांचे दि. २१/२/२००८ चे पत्र.

सुभाष सामुदायिक सहकारी शेती संघाच्या स.नं. २१८ मधून नेताजी सुभाष कॉलनीमध्ये मांजरी रस्त्यापासून प्लॉट नं. ३२ व ३३ पासून स.नं. २९५ च्या कडेने व प्लॉट २४ ते २२ ते प्लॉट नंबर १९ पर्यंत मांजरी रस्त्यास आण्णासाहेब मगर कॉलेज रस्त्यास मिळणारा नागरिक व विद्यार्थ्यांच्या सोयीसाठी कलम २१० अन्वये रिक्वीझीशन करुन ९.१४ मीटर रुंदीची प्रमाण रेषा आखून ताब्यात घेण्यात यावा.

**माहितीसाठी आलेले विषय**

**विषय क्रं. १९०५**

दि. ४/२/२००८ ते दि. १०/२/२००८ अखेर संपणाऱ्या आठवड्यात पुणे म.न.पा.च्या हद्दीत लागलेल्या एकुण २९ आगींबाबत मा.अति.महा.आयुक्त(वि) यांनी पत्र क्र. मआ/अशाद/१२५६ दि. २०/२/२००८ ने पाठविलेला अहवाल माहितीसाठी.

**सेवकवर्गाची प्रकरणे**

**विषय क्र. १९०६**

मुख्य लेखापरिक्षक कार्यालयाकडील सेवकांची रजा मान्य करणेबाबत मा.प्र.मुख्य लेखापरिक्षक यांचे क्र. मुलेप/४२६ दि. २०/२/२००८ चे पत्र.

**विषय क्र. १९०७**

नगरसचिव कार्यालयाकडील सेवकांची रजा मान्य करणेबाबत मा.नगरसचिव यांचे क्र. ७४०५ दि. २२/२/२००८ चे पत्र.

**सर्वात कमी रक्कमेची टेंडर्स**

**विषय क्रं. १९०८**

वॉर्ड क्र. ३७ नायडु हॉस्पिटल येथे विविध ठिकाणी ६ इंची पाण्याची लाईन टाकणे कामी टेंडर्स मागविली असता आलेल्या ४ टेंडसपैकी ठेकेदार मे.प्रतिक कन्स्ट्रक्शन यांचे टेंडर सर्वात कमी रक्कमेचे (टेंडर र.रु. ९,८५,१३६/– पेक्षा १७.७% जास्त) असल्याने त्यांचेकडून र.रुपये ११,५९,५०५=०७ पर्यंत काम करुन घेण्यासाठी त्यांचेबरोबर करार करण्यास मान्यता मिळणेबाबत मा.अति.महा.आयुक्त(ज) यांचे क्र.मआ/उआ(क्र.२)घोले रोड/१२४५ दि. २०/२/२००८ चे पत्र.

(टिप :– उपलब्ध तरतुदीपर्यंत काम करुन घेण्यात येईल.)

UnRegistered

**विषय क्रं. १९०९**

पेव्हमेंट मॅनेजमेंट पध्दतीने सहकारनगर, बिबवेवाडी, धनकवडी, कसबा–विश्रामबागवाडा क्षेत्रिय कार्यालयाचे हद्दीतील सर्व वॉर्डमध्ये रस्ते विकसित करणे कामी फेरटेंडर (दोन पाकीट पध्दती) मागविली असता आलेल्या २ टेंडसपैकी ठेकेदार मे.एस.के.येवले यांचे टेंडर दोघात कमी रक्कमेचे (टेंडर र.रु. ५,०२,९५,३४७/– पेक्षा २.२०% जास्त) असल्याने त्यांचेकडून र.रुपये ५,१४,०१,८४४=६३ पर्यंत तसेच डांबर सिमेंट, लोखंड या तिन्ही मटेरियलचे निर्धारित केलेल्या बेसिक दरामध्ये कंत्राट कालावधीमध्ये वाढ/घट दरानुसार फरकाची रक्कम अदा/वसूल करणे बंधनकारक राहील या अटीस अधिन राहून काम करुन घेण्यासाठी त्यांचेबरोबर करार करण्यास मान्यता मिळणेबाबत मा.अति.महा.आयुक्त(वि) यांचे क्र.मआ/पथ/१२४९ दि.२०/२/२००८ चे पत्र.

**विषय क्रं. १९१०**

वॉर्ड क्र. १३० वडगाव बुाा येथे दवाखाना बांधणे कामी टेंडर्स मागविली असता आलेल्या ४ टेंडसपैकी ठेकेदार मे.पांचाळ कन्स्ट्रक्शन यांचे टेंडर सर्वात कमी रक्कमेचे (टेंडर र.रु. २९,९९,९४७/– पेक्षा १४% जास्त) (तडजोडीने) असल्याने त्यांचेकडून र.रुपये ३४,१९,९३९=५८ पर्यंत काम करुन घेण्यासाठी त्यांचेबरोबर करार करण्यास मान्यता मिळणेबाबत मा.अति.महा.आयुक्त(वि) यांचे क्र.मआ/भवन/१२५० दि. २०/२/२००८ चे पत्र.

**विषय क्रं. १९११**

औंध आनंदपार्क रस्ते पेव्हरने डांबरीकरण करणे कामी टेंडर्स मागविली असता आलेल्या ५ टेंडसपैकी ठेकेदार मे.अश्विनी कन्स्ट्रक्शन प्रा.लि. यांचे टेंडर सर्वात कमी रक्कमेचे (टेंडर र.रु. ९,९९,०९२/– पेक्षा १८.८५% जास्त) (तडजोडीने) असल्याने त्यांचेकडून र.रुपये ११,८६,२३२=३४ पर्यंत काम करुन घेण्यासाठी त्यांचेबरोबर करार करण्यास मान्यता मिळणेबाबत मा.अति.महा.आयुक्त(वि) यांचे क्र.मआ/उआ(क्र.१)घोले रोड/पथ/१२५१ दि. २०/२/२००८ चे पत्र.

**विषय क्रं. १९१२**

औंध बाणेर हद्दीवरील रस्ते लोकमंगल ते चैत्रबन डांबरीकरण करणे कामी टेंडर्स मागविली असता आलेल्या ४ टेंडसपैकी ठेकेदार मे.पेव्हवे कन्स्ट्रक्शन प्रा.लि. यांचे टेंडर सर्वात कमी रक्कमेचे (टेंडर र.रु. ९,९९,७७५/– पेक्षा १८.९५% जास्त) (तडजोडीने) असल्याने त्यांचेकडून र.रुपये ११,८९,२३२=३६ पर्यंत काम करुन घेण्यासाठी त्यांचेबरोबर करार करण्यास मान्यता मिळणेबाबत मा.अति.महा.आयुक्त(वि) यांचे क्र.मआ/उआ(क्र.१)औंध/पथ/१२५३ दि. २०/२/२००८ चे पत्र.

Unregistered

**विषय क्रं. १९१३**

वॉर्ड क्र. १५ हौसिंग बोर्ड येथे पाण्याची लाईन टाकणे कामी टेंडर्स मागविली असता आलेल्या २ टेंडसपैकी ठेकेदार प्रतिक कन्स्ट्रक्शन यांचे टेंडर दोघात कमी रक्कमेचे (टेंडर र.रु.१९,६९,१५१/– पेक्षा २२% जास्त) असल्याने त्यांचेकडून र.रु. २४,०२,३६४=२२ पर्यंत काम करुन घेण्यासाठी त्यांचेबरोबर करार करण्यास मान्यता मिळणेबाबत मा.अति.महा.आयुक्त(वि) यांचे क्र.मआ/पापु/१२५४ दि.२०/२/२००८ चे पत्र

**विषय क्रं. १९१४**

नरपतगिरी चौक ते पावर हाऊस चौक नाल्यावरील जुना स्लॅब तोडून नवा स्लॅब टाकणे (फेज २ फेरटेंडर) कामी फेरटेंडर्स मागविली असता आलेल्या ४ टेंडसपैकी ठेकेदार मे.पिलाणे डावरे कन्स्ट्रक्शन यांचे टेंडर सर्वात कमी रक्कमेचे (टेंडर र.रु. १,२५,३५,०४९=९० पेक्षा १९.३६% जास्त) (तडजोडीने) असल्याने त्यांचेकडून र.रुपये १,४९,६१,८३५=५६ अधिक भाववाढ सुत्रानूसार येणाऱ्या रकमेपर्यंत काम करुन घेण्यासाठी त्यांचेबरोबर करार करण्यास मान्यता मिळणेबाबत मा.अति.महा.आयुक्त(वि) यांचे क्र.मआ/विअ/पथ/१२५८ दि. २१/२/२००८ चे पत्र.

**विषय क्रं. १९१५**

पुणे पेठ भवानी श्री अक्कलकोट स्वामी समर्थ बालोद्यान सि.स.नं. ८६अ, ८६ब, ८७, ८७/१/२ याठिकाणी सांस्कृतिक भवन (सभामंडप) चे काम करणे कामी टेंडर्स मागविली असता आलेल्या ३ टेंडसपैकी ठेकेदार मे.पिलाणे डावरे कन्स्ट्रक्शन यांचे टेंडर सर्वात कमी रक्कमेचे (टेंडर र.रु. २९,९९,४५३/- पेक्षा ११.१४% जास्त) (तडजोडीने) असल्याने त्यांचेकडून र.रुपये ३३,३३,५९२=०६ पर्यंत काम करुन घेण्यासाठी त्यांचेबरोबर करार करण्यास मान्यता मिळणेबाबत मा.अति.महा.आयुक्त(वि) यांचे क्र.मआ/उद्यान/१२५९ दि. २१/२/२००८ चे पत्र.

**एकच टेंडर प्रकरणे**

**विषय क्रं. १९१६**

वॉर्ड क्र. ७३ अपोलो टॉकीज ते के.ई.एम.हॉस्पिटल रस्ता, अपोलो ते दारुवाला पूल रस्ता पेव्हर फिनिशरने डांबरीकरण करणे कामी टेंडर्स मागविली असता पेव्हवे कन्स्ट्रक्शन प्रा.लि. यांचे एकच टेंडर आले (टेंडर र.रु. ९,९९,७७२/- पेक्षा २०% जास्त) (तडजोडीने) असल्याने त्यांचेकडून र.रुपये ११,९९,७२६=४० पर्यंत काम करुन घेण्यासाठी त्यांचेबरोबर करार करण्यास मान्यता मिळणेबाबत मा.अति.महा.आयुक्त(वि) यांचे क्र.मआ/उआ(क्र.३)भवानी पेठ/पथ/१२५२ दि. २०/२/२००८ चे पत्र.

**विषय क्रं. १९१७**

वॉर्ड क्र. ८५ मध्ये विविध ठिकाणी रस्ते पेव्हर फिनिशरने डांबरीकरण करणे कामी टेंडर्स मागविली असता पेव्हवे कन्स्ट्रक्शन प्रा.लि. यांचे एकच टेंडर आले (टेंडर र.रु. ९,९९,९४६/- पेक्षा २०% जास्त) (तडजोडीने) असल्याने त्यांचेकडून र.रुपये ११,९९,९३५=२० पर्यंत काम करुन घेण्यासाठी त्यांचेबरोबर करार करण्यास मान्यता मिळणेबाबत मा.अति.महा.आयुक्त(वि) यांचे क्र.मआ/उआ(क्र.३)भवानी/पथ/१२५५ दि. २०/२/२००८ चे पत्र.

**मागील सभेचे विषय**

**विषय क्र. १९१८**

पुणे मनपा वाढीव हद्दीतील २३ गावांमधील डोंगर उताराचे कंटूर सर्वेक्षण करुन १:५ या निकषानुसार डोंगरपायथ्याची हद्द निश्चित करणे या कामाचे नकाशांचे अवलोकन होणेबाबत मा.महा.आयुक्त यांचे क्र. मआ/नअ/११९७ दि. ५/२/२००८ चे पत्र.

(सदर विषयाचा विचार पुढील सभेत करावा असे दि. १८/२/२००८ च्या सभेत ठरले होते.)

**विषय क्रं. १९१९**

पुणे शहराच्या जुन्या हद्दीतील डोंगर पायथ्याचे कंटूर सर्वेक्षण करुन डोंगरपायथ्याची हद्द निश्चित करणे कामी निविदा मागविल्या असता आलेल्या ४ निविदांपैकी मे.मोनार्च सर्व्हेअर्स आणि कॉन्ट्रॅक्टर्स प्रा.लि. यांची निविदा सर्वात कमी रकमेची असल्याने त्यांचेकडून त्यांची निविदा रक्कम रुपये १७ लाख ४४ हजार ३५० पर्यंत काम करुन घेण्यासाठी त्यांचेबरोबर करार करण्यास मान्यता मिळणेबाबत मा.महा.आयुक्त यांचे क्र.मआ/नअ/१००७ दि. ३/१/२००८ चे पत्र.

(सदर विषयाचा विचार पुढील सभेत करावा असे दि. १८/२/२००८ च्या सभेत ठरले होते.)

**विषय क्रं. १९२०**

पर्वती स.नं. ६३ मोरेवस्ती या झोपडपट्टीसाठी बीपीएमसी ॲक्ट १९४९ चे कलम २०५ अन्वये आखणेत आलेल्या ६ मी. रस्तारुंदीत बाधित क्षेत्राचा भूसंपादनाद्वारे ताबा घेणेस व त्या अनुषंगाने आर्थिक तरतूद उपलब्ध होणेस मान्यता मिळणेबाबत मा.महा.आयुक्त यांचे क्र. मआ/विका(भूसं)/११५८ दि. १/२/२००८ चे पत्र.

(सदर विषयाचा विचार पुढील सभेत करावा असे दि. १८/२/२००८ च्या सभेत ठरले होते.)

Unregistered

**विषय क्रं. १९२१**

लोहगांव स.नं. १३४/४ या मिळकतीपैकी जागा जकात नाक्यासाठी भाडेतत्वावर घेणेसाठी भाडे ठरविणेबाबत मा.महा.आयुक्त यांचे क्र. मआ/आयातकर/१२०६ दि. ६/२/२००८ चे पत्र.
(सदर विषयाचा विचार पुढील सभेत करावा असे दि. १८/२/२००८ च्या सभेत ठरले होते.)

**संकिर्ण**

**विषय क्रं. १९२२**

डॉ.नानासाहेब परुळेकर सकाळ चॅरिटेबल ट्रस्ट व पुणे मनपामार्फत १४४ वॉर्डाच्या सर्व आरोग्य कोठ्यांमध्ये आदर्श मोकादम स्पर्धा राबविण्यात येणार असून सदर स्पर्धेसाठी एकूण र.रुपये २,६०,०००/- इतका खर्च येणार असून, यापैकी निम्मा खर्च डॉ.नानासाहेब परुळेकर सकाळ चॅरिटेबल ट्रस्ट करणार असून उर्वरित म्हणजेच र.रुपये १,३०,०००/- इतका खर्च पुणे मनपाने बजेटहेड संकिर्णमधून करणेस मान्यता मिळणेबाबत मा.अति.महा.आयुक्त(ज) यांचे क्र. मआ/उआ(घनकचरा)/१२४३ दि. १८/२/२००८ चे पत्र.

**विषय क्रं. १९२३**

केंद्र शासनातर्फे दि. २७/९/२००७ ते दि. ३०/९/२००७ या कालावधीमध्ये एन.एस.ई.ग्राऊंडस, गोरेगाव, मुंबई येथे इंडिया यु.एस.पी. २००७ हे प्रदर्शन आयोजित करणेत आलेले होते. तरी सदर प्रदर्शनामध्ये भाग घेण्याकरीता व त्याप्रित्यर्थ झालेल्या र.रुपये २,०१,८३०/- चे खर्चास पश्चात मान्यता मिळणेबाबत मा.महा.आयुक्त यांचे क्र. मआ/जनेराशपुअ/१२४४ दि. १८/२/२००८ चे पत्र.

**विषय क्रं. १९२४**

सन १९८७ साली शासनाने मंजूर केलेल्या पुणे शहराच्या जुन्या हद्दीच्या विकास आराखड्याच्या एमआरटिपी ॲक्ट १९६६ चे कलम ३८ नुसार पुनरावलोकन करताना सोशीओ-इकॉनॉमिक सर्वेक्षण भविष्यकालीन आढावा व प्रस्ताव करण्यासाठी मुंबई प्रांतिक महापालिका अधिनियमामधील कलम ५.२.२ नुसार निविदा न मागविता कर्वे इन्स्टीटयूट ऑफ सोशिल सर्व्हिसेस, पुणे या संस्थेची नेमणूक करणेस व त्यांचेबरोबर करार करणेस मान्यता मिळणेबाबत मा.महा.आयुक्त यांचे क्र. मआ/नअ/१२४६ दि. २०/२/२००८ चे पत्र.

**विषय क्रं. १९२५**

रक्कम रुपये ३५ कोटी १ वर्ष मुदतीसाठी गुंतवणूक करणेबाबत मा.अति.महा.आयुक्त(ज) यांचे क्र.मआ/मुले/१२४७ दि. २०/२/२००८ चे पत्र.

**विषय क्रं. १९२६**

रक्कम रुपये ३५ कोटी १ वर्ष मुदतीसाठी गुंतवणूक करणेबाबत मा.अति.महा.आयुक्त(ज) यांचे क्र.मआ/मुले/१२४८ दि. २०/२/२००८ चे पत्र.

**विषय क्रं. १९२७**

मा.राजेंद्र काची व मा.संदिप लडकत यांचे दि. २२/२/२००८ चे पत्र.

श्री स्वामी विवेकानंद शिक्षण प्रसारक मंडळ आयोजित राज्यस्तरीय कबड्डी स्पर्धा भरविणेत आली आहे. सदर स्पर्धेस सहप्रायोजकत्व स्विकारुन रुपये २.५० लाख आर्थिक सहाय्य देण्यात यावे.

UnRegistered

**विषय क्र. १९२८**

पुणे मनपा आरोग्य खात्याच्या नियंत्रणाखालील रुग्णालये व प्रसुतीगृहांकडे मानद भूलतज्ञ डॉक्टरांचे मानधनात खालीलप्रमाणे वाढ करण्यास मान्यता मिळणेबाबत मा.महा.आयुक्त यांचे पत्र क्र. मआ/आरोग्य/१२६३ दि. २२/२/२००८ चे पत्र.

| ऑपरेशनचा प्रकार | कॉल प्रकार | प्रस्तावित वाढ | दर |
|---|---|---|---|
| मेजर ऑपरेशन | अे कॉल | २०० | रु. ५००/– प्रति कॉल |
| सेमी मेजर ऑपरेशन | बी कॉल | १५० | रु. ३००/– प्रति कॉल |
| मायनर ऑपरेशन | सी कॉल | ७५ | रु. १५०/– प्रति कॉल |
| इर्मजन्सी ऑपरेशन | ई कॉल | १०० | नेहमीचा दर (कॉल प्रकार) + रु. २००/– फक्त |

**विषय क्र. १९२९**

पुणे मनपा आरोग्य खात्याच्या नियंत्रणाखालील दवाखाने, रुग्णालये व प्रसुतीगृहांकडे वेगवेगळ्या विषयांतील तज्ञ डॉक्टर मानधनावर काम पाहतात. अशा सर्व मानधनावरील मानद तज्ञ डॉक्टरांना दि. १/९/१९९३ पासून दरमहा र.रुपये ५००/– (अक्षरी रुपये पाचशे) फक्त मानधन देण्यात येत आहे.

तरी मानधनावर काम पाहणाऱ्या मानद तज्ञ डॉक्टरांचे मानधन दरमहा र.रुपये १,५००/– (अक्षरी रुपये एक हजार पाचशे) फक्त करणेस मान्यता मिळणेबाबत मा.महा.आयुक्त यांचे पत्र क्र. मआ/आरोग्य/१२६४ दि. २२/२/२००८ चे पत्र.

**विषय क्र. १९३०**

पुणे, पेठ भांबुर्डा येथील स.नं. ३५९ समोरील रस्ता ३० फूट रुंद करणेबाबत मा.बाळासाहेब बोडके व मा.अनिल भोसले यांचे दि. ६/९/२००५ चे पत्रावर झालेला स्थायी समिती ठ.क्र. १०२४ दि. १३/९/२००५ ला अनुसरुन मा.महा.आयुक्त यांनी पत्र क्र. मआ/उआ/भूप्रा/१२६७ दि. २२/२/२००८ ने पाठविलेला अभिप्राय विचारासाठी.

**दाखल विषय**

**विषय क्र. १९३१**

मा.सुनिल बनकर व मा.सौ.मेधा कुलकर्णी यांचे दि. २६/२/२००८ चे पत्र.

वॉर्ड क्र. ९४ सातववाडी मध्ये माध्यमिक शाळेसाठी जागा आरक्षित असून सदरची जागा पुणे मनपाच्या ताब्यात घेऊन शाळा बांधण्यास मान्यता देण्यात यावी.

**विषय क्र. १९३२**

मा.सुनिल कांबळे व मा.विजय मारटकर यांचे दि. २८/२/२००८ चे पत्र.

स्थायी समिती ठराव क्र. १८७९ दि. १८/२/२००८ चा फेरविचार करण्यात यावा. (क्रिटीकल पब्लीक प्लेस सर्व्हायलन्स (सि.पी.पी.एस.एस.) गारबेज/ऑक्टराय व्हेईकल मॅनेजमेंट सिस्टीम (जि.व्ही.एम.एस.) रेड लाईट व्हायोलेशन डिटेक्शन सिस्टीम (आर.व्ही.टी.एस.) ऐरिया ट्रॅफिक कन्ट्रोल सिस्टीम (एटी.सी.एस.) पॅसेंजर इनफॉरमेशन सिस्टीम फॉर बी.आर.टी.एस. कॅरिडॉर (पी.आय.एस.) व स्पिड लि. व्हायलेशन डिटेक्शन सिस्टीम (एस.व्ही.डी.एस.)–(सि.जी.आर.ए.पी.एस.) कामाबाबत)

UnRegistered

**विषय क्र. १९३३**

मा. सुनिल कांबळे, मा. सौ. अलका खाडे यांचे दिनांक २८/२/२००८ चे पत्र.

स्थायी समिती ठ.क्र. ९४६ दि. २६/९/२००६ चा फेरविचार करण्यात यावा. (पुणे विद्यापीठ क्षेत्रातील निवासी व शैक्षणिक संकुलातील अंतर्गत ड्रेनेज लाईन्स मनपाचे मुख्य लाईनला जोडणे या कामाबाबत)

**विषय क्र. १९३४**

मा.आबा बागुल, मा.सुनिल कांबळे, मा.वसंत मोरे, मा.विजय मारटकर, मा.राजेंद काची, मा.महादेव बाबर, मा.दिलिप उंबरकर, मा.संदिप लडकत, मा.अरुण धिमधिमे, मा.सौ.अलका खाडे, मा.बापूसाहेब पठारे, अध्यक्ष, स्थायी समिती, मा.दिपक मानकर, मा.सौ.कमल व्यवहारे, मा.सुनिल बनकर व मा.शंकर बेलदरेपाटील यांचे दि. २८/२/२००८ चे पत्र.

नव्याने होणाऱ्या एस.आर.अे. योजनेमध्ये पुणे मनपाचे नगरसेवकांचा त्या भागामध्ये होणाऱ्या पुर्नवसनामध्ये समावेश असावा, कारण योजना होत असताना झोपडपट्टी धारकांना दमदाटी केली जाते. त्यामुळे त्या-त्या भागातील नगरसेवकांचा समावेश असण्यास व एस.आर.अे. चा नकाशा मान्य करण्याचे अधिकार १९४९ च्या नियमानुसार महापालिकेला देण्यास मान्यता द्यावी.

**विषय क्र. १९३५**

वॉर्ड क्र.२२ येथे विविध ठिकाणी पाण्याची लाईन टाकणे कामी टेंडर्स मागविली असता श्री.संजय शांताराम धनकवडे यांचे एकच टेंडर (टेंडर र.रु. १४,९९,६६३/- पेक्षा ३१.११% जास्त) आले असल्याने त्यांचेकडून र.रुपये १९,६६,२०८=१५ पर्यंत काम करुन घेण्यासाठी त्यांचेबरोबर करार करण्यास मान्यता मिळणेबाबत मा.अति.महा.आयुक्त(वि) यांचे क्र.मआ/पापु/१२७२ दि. २५/२/२००८ चे पत्र.

**विषय क्र. १९३६**

अंदाजपत्रकातील मान्य तरतूदीमधून र.रुपये २०१.४० लाखाचे वर्गीकरण भवन रचना खात्याकडील सन २००७-०८ च्या भांडवली कामांची सोबत जोडलेली यादी अ अ.क्र. १ ते २९ प्रमाणे या खात्यातून उप आयुक्त(तांत्रिक), विद्युत खात्याकडील सन २००७-०८ च्या भांडवली कामांची सोबत जोडलेली यादी ब अ.क्र. १ ते ९ प्रमाणे या खात्याकडे करण्यास मान्यता मिळणेबाबत मा.अति.महा.आयुक्त(वि) यांचे क्र.मआ/मुले/१२७३ दि. २६/२/२००८ चे पत्र.

**विषय क्र. १९३७**

भवानी व हडपसर क्षेत्रिय कार्यालयाचे अखत्यारितील रस्त्याचे खडीकरण व तदनुषंगिक कामे करणे कामी टेंडर्स मागविली असता आलेल्या २ टेंडसपैकी ठेकेदार मे.सदगुरु कन्स्ट्रक्शन कंपनी यांचे टेंडर दोघात कमी रक्कमेचे (टेंडर र.रु. १,४३,७४,६११/- पेक्षा १८.३९% कमी) असल्याने त्यांचेकडून र.रुपये १,१७,३१,१२०=०४ पर्यंत काम करुन घेणेस अधिक सिमेंट, स्टिल व डांबर यांचे बाजारभावानुसार फरक (वाढ/कपात) अदा करणेस व त्यांचेबरोबर करार करण्यास मान्यता मिळणेबाबत मा.अति.महा.आयुक्त(वि) यांचे क्र.मआ/पथ/१२७५ दि. २७/२/२००८ चे पत्र.

Unregistered

**विषय क्र. १९३८**

प्रभाग क्र. १८ कात्रज कोंढवा रोड स.नं. ३२ चे कडेने गुजरवाडी रोड येथील ओढ्यावर पूल बांधणे व तदनुषंगिक कामे करणे कामी टेंडर्स मागविली असता आलेल्या ५ टेंडसपैकी ठेकेदार मे.शिंदे ॲण्ड शिंदे कन्स्ट्रक्शन यांचे टेंडर सर्वात कमी रक्कमेचे (टेंडर र.रु. ३२,५३,८००/– पेक्षा ९.९९% जास्त) असल्याने त्यांचेकडून र.रुपये ३५,७८,८५४=६२ पर्यंत काम करुन घेणेस तसेच डांबर, सिमेंट, लोखंड या तिन्ही मटेरियलचे निर्धारित केलेल्या बेसिक दरामध्ये कंत्राट कालावधीमध्ये वाढ/घट दरानुसार फरकाची रक्कम अदा/वसूल करणे बंधनकारक राहील या अटीस अधिन राहून त्यांचेबरोबर करार करण्यास मान्यता मिळणेबाबत मा.अति.महा.आयुक्त(वि) यांचे क्र.मआ/पथ/१२७६ दि. २७/२/२००८ चे पत्र.

**विषय क्र. १९३९**

मुंजोबा वस्तीला जोडणाऱ्या रस्त्यासाठी कल्व्हर्ट बांधणे व तदनुषंगिक कामे करणे कामी टेंडर्स मागविली असता आलेल्या ४ टेंडसपैकी ठेकेदार श्री.कैलास डी.बिरामणे यांचे टेंडर सर्वात कमी रक्कमेचे (टेंडर र.रु. ६१,२३,९२२/– पेक्षा १०.४०% जास्त) (तडजोडीने) असल्याने त्यांचेकडून र.रुपये ६७,६०,८०९=८८ पर्यंत काम करुन घेणेस तसेच डांबर, सिमेंट, लोखंड या तिन्ही मटेरियलचे निर्धारित केलेल्या बेसिक दरामध्ये कंत्राट कालावधीमध्ये वाढ/घट दरानुसार फरकाची रक्कम अदा/वसूल करणे बंधनकारक राहील या अटीस अधिन राहून त्यांचेबरोबर करार करण्यास मान्यता मिळणेबाबत मा.अति.महा.आयुक्त(वि) यांचे क्र.मआ/पथ/१२७७ दि. २७/२/२००८ चे पत्र.

**विषय क्र. १९४०**

धायरी शेवटचा बसस्टॉप ते नऱ्हे रस्त्यापर्यंत १२ इंची पाण्याची लाईन टाकणे कामी टेंडर्स मागविली असता आलेल्या १० टेंडसपैकी ठेकेदार मे.अक्षय एंटरप्राईजेस यांचे टेंडर सर्वात कमी रक्कमेचे (टेंडर र.रु. २९,९३,८१०/– पेक्षा ९% जास्त) असल्याने त्यांचेकडून र.रुपये ३२,६३,२५२=९० पर्यंत काम करुन घेण्यासाठी त्यांचेबरोबर करार करण्यास मान्यता मिळणेबाबत मा.अति.महा.आयुक्त(वि) यांचे क्र.मआ/पापु/१२७८ दि. २७/२/२००८ चे पत्र.

**विषय क्र. १९४१**

पर्वती जलकेंद्र येथे ए.सी.बी.पॅनेल पुरविणे व बसविणे कामी टेंडर्स मागविली असता आलेल्या ३ टेंडसपैकी ठेकेदार मे.बोंद्रे ॲण्ड असोसिएटस यांचे टेंडर सर्वात कमी रक्कमेचे (टेंडर र.रु. २५,५१,०५४/– पेक्षा ११.४४% कमी) असल्याने त्यांचेकडून र.रुपये २२,५९,२१३=४२ पर्यंत काम करुन घेण्यासाठी त्यांचेबरोबर करार करण्यास मान्यता मिळणेबाबत मा.अति.महा.आयुक्त(वि) यांचे क्र.मआ/पापु/१२७९ दि. २७/२/२००८ चे पत्र.

**विषय क्र. १९४२**

प्रभाग क्र. १४ शांतीनगर ते नगररोड परिसरातील नाला चॅनेलायझेशन करणे व मुख्य रस्त्यावर स्टार्मवॉटर लाईन टाकणे कामी टेंडर्स मागविली असता आलेल्या ५ टेंडसपैकी ठेकेदार दिपक सुनका मांजरेकर यांचे टेंडर सर्वात कमी रक्कमेचे (टेंडर र.रु. १९,९९,६९५/– पेक्षा १४.९९% कमी) असल्याने त्यांचेकडून र.रुपये १६,९९,९४०=७२ पर्यंत काम करुन घेण्यासाठी त्यांचेबरोबर करार करण्यास मान्यता मिळणेबाबत मा.अति.महा.आयुक्त(वि) यांचे क्र.मआ/मलनि/१२८० दि. २७/२/२००८ चे पत्र.

UnRegistered

**विषय क्र. १९४३**

पुणे शहरातील दाट वस्ती असलेल्या ठिकाणी तसेच अरुंद रस्ते व शहरातील वाहतूकीची कोंडी लक्षात घेता आगीच्या ठिकाणी पोहचणे शक्य होण्यासाठी मनपाने पुरविलेल्या जीप संवर्गातील चासीजवर अग्निशमन दल विभागासाठी वॉटर मिस्ट तंत्रज्ञानाने बनविलेल्या २ मिनी फायर टेंडर बांधून पुरविणे कामी टेंडर्स मागविली असता आलेल्या ३ टेंडसपैकी ठेकेदार मे.मुरली टेक्नो प्रा.लि., ठाणे यांचे टेंडर सर्वात कमी रक्कमेचे असल्याने त्यांचेकडून त्यांच्या निवेदनातील अटी स्विकारुन र.रुपये ३९,८४,७५०/– पर्यंत सर्व करांसह घेणेपोटी त्यांचेबरोबर करार करण्यास मान्यता मिळणेबाबत मा.अति.महा.आयुक्त(वि) यांचे क्र.मआ/उआ(क्र.१)व्हे.डेपो/१२८१ दि. २७/२/२००८ चे पत्र.

**विषय क्र. १९४४**

कोथरुड स.नं. ८७ परांजपे नर्सरी स्कूलसमोर विरंगुळा केंद्र बांधणे कामी टेंडर्स मागविली असता आलेल्या ४ टेंडसपैकी ठेकेदार श्री.मंदार वसंत देवरे यांचे टेंडर सर्वात कमी रक्कमेचे (टेंडर र.रु. २०,८९,७५८/– पेक्षा १४% जास्त)(तडजोडीने) असल्याने त्यांचेकडून र.रुपये २३,८२,३२४=१२ पर्यंत काम करुन घेण्यासाठी त्यांचेबरोबर करार करण्यास मान्यता मिळणेबाबत मा.अति.महा.आयुक्त(वि) यांचे क्र.मआ/भवन/१२८२ दि. २७/२/२००८ चे पत्र.

**विषय क्र. १९४५**

वैकुंठ स्मशानभूमी येथे दहन शेड क्र. १ पाडून नविन दहन शेड बांधकाम करणे कामी टेंडर्स मागविली असता आलेल्या ३ टेंडसपैकी ठेकेदार मे.योजना कन्स्ट्रक्शन यांचे टेंडर सर्वात कमी रक्कमेचे (टेंडर र.रु. १५,६५,३३३=५० पेक्षा १३% जास्त)(तडजोडीने) असल्याने त्यांचेकडून र.रुपये १७,६८,८२६=८५ पर्यंत काम करुन घेण्यासाठी त्यांचेबरोबर करार करण्यास मान्यता मिळणेबाबत मा.अति.महा.आयुक्त(वि) यांचे क्र.मआ/भवन/१२८३ दि. २७/२/२००८ चे पत्र.

**विषय क्र. १९४६**

वॉर्ड क्र. ६१ कोथरुड डावी भुसारी कॉलनी मधील रस्ते डांबरी करणे कामी टेंडर्स मागविली असता आलेल्या ७ टेंडसपैकी ठेकेदार सनशाईन पेव्हींग्ज प्रा.लि. यांचे टेंडर सर्वात कमी रक्कमेचे (टेंडर र.रु. ११,९९,९४१/– पेक्षा ३.१२% जास्त) असल्याने त्यांचेकडून र.रुपये १२,३७,२९१=५१ पर्यंत काम करुन घेण्यासाठी त्यांचेबरोबर करार करण्यास मान्यता मिळणेबाबत मा.अति.महा.आयुक्त(वि) यांचे क्र.मआ/उआ(क्र.१) कर्वेरोड/१२८४ दि. २७/२/२००८ चे पत्र.

**विषय क्र. १९४७**

शाहू महाराज पथावरील रुबी हॉल क्लिनिक समोरील रस्ता डांबरी करणे (पेव्हर) कामी टेंडर्स मागविली असता आलेल्या ४ टेंडसपैकी ठेकेदार मे.कला बिल्डर्स यांचे टेंडर सर्वात कमी रक्कमेचे (टेंडर र.रु. ९,९८,१४८=९० पेक्षा १५% जास्त) (तडजोडीने) असल्याने त्यांचेकडून र.रुपये ११,४७,८७१=२४ पर्यंत काम करुन घेण्यासाठी त्यांचेबरोबर करार करण्यास मान्यता मिळणेबाबत मा.अति.महा.आयुक्त(ज) यांचे क्र.मआ/उआ(क्र.२)/१२८५ दि. २७/२/२००८ चे पत्र.

**विषय क्र. १९४८**

जयजवाननगर, रामनगर व नाईकनगरमधील जुन्या ड्रेनेज लाईन बदलून नविन टाकणे व गल्लीबोळ कॉंक्रीट करणे कामी टेंडर्स मागविली असता आलेल्या ५ टेंडसपैकी ठेकेदार मे.वैशाली कन्स्ट्रक्शन यांचे टेंडर सर्वात कमी रक्कमेचे (टेंडर र.रु. १४,१७,८१७/– पेक्षा २५.२५% कमी) (तडजोडीचा दर) असल्याने त्यांचेकडून र.रुपये १०,५९,८१८=२१ पर्यंत काम करुन घेण्यासाठी त्यांचेबरोबर करार करण्यास मान्यता मिळणेबाबत मा.अति.महा.आयुक्त(ज) यांचे क्र.मआ/उआ(क्र.३)गवनि/१२९० दि. २७/२/२००८ चे पत्र.

UnRegistered

**विषय क्र. १९४९**

वॉर्ड क्र. ४३ म.फुले वसाहत येथे ४ ते ८ इंची पाण्याची लाईन टाकणे कामी टेंडर्स मागविली असता आलेल्या ३ टेंडसपैकी ठेकेदार मे.अक्षय एन्टरप्रायझेस यांचे टेंडर सर्वात कमी रक्कमेचे (टेंडर र.रु. ९,९९,९८८/- पेक्षा ९.८०% जास्त) असल्याने त्यांचेकडून र.रुपये १०,९७,९८६=८२ पर्यंत काम करुन घेण्यासाठी त्यांचेबरोबर करार करण्यास मान्यता मिळणेबाबत मा.अति.महा.आयुक्त(ज) यांचे क्र.मआ/उआ(क्र.४) हडपसर/१२९१ दि. २७/२/२००८ चे पत्र.

**विषय क्र. १९५०**

धनकवडी स.नं. १४, शंकर महाराज वसाहत येथे जुने शौचालय पाडून नविन शौचालय बांधणे कामी टेंडर्स मागविली असता आलेल्या ४ टेंडसपैकी ठेकेदार रमेश एफ.कुंकूलोळ यांचे टेंडर सर्वात कमी रक्कमेचे (टेंडर र.रु. १९,२१,४१९/- पेक्षा ३.६% कमी) असल्याने त्यांचेकडून र.रुपये १८,५२,२४७=९२ पर्यंत काम करुन घेण्यासाठी त्यांचेबरोबर करार करण्यास मान्यता मिळणेबाबत मा.अति.महा.आयुक्त(ज) यांचे क्र.मआ/उआ(क्र.३) गवनि/१२९२ दि. २७/२/२००८ चे पत्र.

**विषय क्र. १९५१**

वॉर्ड क्र. १०२, स.नं. १३२ कॅनॉल ते आंबिल ओढा दरम्यानचा ओढा दुरुस्त करुन स्लॅब टाकणे अंतर्गत नाला चॅनेलायझेशन करणे कामी टेंडर्स मागविली असता आलेल्या २ टेंडसपैकी ठेकेदार मे.अविनाश कन्स्ट्रक्शन यांचे टेंडर दोघात कमी रक्कमेचे (टेंडर र.रु. १४,९९,५९३=८८ पेक्षा १३% कमी) असल्याने त्यांचेकडून पुर्वगणित र.रुपये १५,००,०००/- पर्यंत काम करुन घेण्यासाठी त्यांचेबरोबर करार करण्यास मान्यता मिळणेबाबत मा.अति.महा.आयुक्त(वि) यांचे क्र.मआ/मलनि/१२९३ दि. २७/२/२००८ चे पत्र.

**विषय क्र. १९५२**

सहकारनगर क्षेत्रिय कार्यालयातंर्गत मुख्य रस्त्यावरील चौकात मास्टीक अस्फाल्ट पध्दतीने विकसित करणे कामी टेंडर्स मागविली असता आलेल्या ५ टेंडसपैकी ठेकेदार मे.महिम्ना कन्स्ट्रक्शन यांचे टेंडर सर्वात कमी रक्कमेचे (टेंडर र.रु. ४९,४९,०२५/- पेक्षा १८% कमी) असल्याने त्यांचेकडून र.रुपये ४०,५८,२००=५० पर्यंत काम करुन घेणेस तसेच डांबर, सिमेंट, लोखंड या तिन्ही मटेरियलचे निर्धारित केलेल्या बेसिक दरामध्ये कंत्राट कालावधीमध्ये वाढ/घट दरानुसार फरकाची रक्कम अदा/वसूल करणे बंधनकारक राहील या अटीस अधिन राहून त्यांचेबरोबर करार करण्यास मान्यता मिळणेबाबत मा.अति.महा.आयुक्त(वि) यांचे क्र.मआ/पथ/१२९४ दि. २७/२/२००८ चे पत्र.

**विषय क्र. १९५३**

सिध्दगिरी ते चिंतामणी बंगला डी.पी.रस्ता विकसित करणे कामी टेंडर्स मागविली असता टी.जी.धमाणी यांचे एकच टेंडर आले (टेंडर र.रु. २६,९९,८३८/- पेक्षा ५.८५% जास्त) असल्याने त्यांचेकडून र.रुपये २८,५७,७७८=५२ पर्यंत काम करुन घेणेस तसेच डांबर, सिमेंट, स्टील या तिन्ही मटेरियलचे निर्धारित केलेल्या बेसिक दरामध्ये कंत्राट कालावधीमध्ये वाढ/घट दरानुसार फरकाची रक्कम अदा/वसूल करणे बंधनकारक राहील या अटीस अधिन राहून त्यांचेबरोबर करार करण्यास मान्यता मिळणेबाबत मा.अति.महा.आयुक्त(वि) यांचे क्र.मआ/पथ/१२९६ दि. २७/२/२००८ चे पत्र.

**विषय क्र. १९५४**

पत्र्यामारुती मंदिर ते मोदी गणपती ते कासटपार पावसाळी लाईन टाकणे कामी टेंडर्स मागविली असता आलेल्या आलेल्या ३ टेंडसपैकी ठेकेदार मे.विक्रम अगरवाल यांचे टेंडर सर्वात कमी रक्कमेचे (टेंडर र.रु. १८,०८,२६०/- पेक्षा २५.१८% कमी) असल्याने त्यांचेकडून र.रुपये १३,५२,९४०=१३ पर्यंत काम करुन घेणेस तसेच डांबर, सिमेंट, लोखंड या तिन्ही मटेरियलचे निर्धारित केलेल्या बेसिक दरामध्ये कंत्राट कालावधीमध्ये वाढ/घट दरानुसार फरकाची रक्कम अदा/वसूल करणे बंधनकारक राहील या अटीस अधिन राहून त्यांचेबरोबर करार करण्यास मान्यता मिळणेबाबत मा.अति.महा.आयुक्त(वि) यांचे क्र.मआ/पथ/१२९५ दि. २७/२/२००८ चे पत्र.

UnRegistered

**विषय क्र. १९५५**

एकोपा सोसायटीमधील रस्ते डांबरीकरण करणे (पेव्हर फिनिशरने) कामी टेंडर्स मागविली असता आलेल्या आलेल्या ३ टेंडसपैकी ठेकेदार टी.जी.धमानी यांचे टेंडर सर्वात कमी रक्कमेचे (टेंडर र.रु. २४,९९,६६८/– पेक्षा १४.९०% जास्त) असल्याने त्यांचेकडून र.रुपये २८,७२,११८=५३ पर्यंत काम करुन घेणेस तसेच डांबर, सिमेंट, लोखंड या तिन्ही मटेरियलचे निर्धारित केलेल्या बेसिक दरामध्ये कंत्राट कालावधीमध्ये वाढ/घट दरानुसार फरकाची रक्कम अदा/वसूल करणे बंधनकारक राहील या अटीस अधिन राहून त्यांचेबरोबर करार करण्यास मान्यता मिळणेबाबत मा.अति.महा.आयुक्त(वि) यांचे क्र.मआ/पथ/१२९७ दि. २७/२/२००८ चे पत्र.

**विषय क्र. १९५६**

धनकवडी, बिबवेवाडी क्षेत्रिय कार्यालयातंर्गत मुख्य रस्त्यावरील चौक मास्टीक अस्फाल्ट पध्दतीने विकसित करणे कामी टेंडर्स मागविली असता आलेल्या आलेल्या ६ टेंडसपैकी ठेकेदार मे.प्रियंका कन्स्ट्रक्शन यांचे टेंडर सर्वात कमी रक्कमेचे (टेंडर र.रु. ४९,४९,०२५/– पेक्षा १८% कमी) असल्याने त्यांचेकडून र.रुपये ४०,५८,२००=५० पर्यंत काम करुन घेणेस तसेच डांबर, सिमेंट, लोखंड या तिन्ही मटेरियलचे निर्धारित केलेल्या बेसिक दरामध्ये कंत्राट कालावधीमध्ये वाढ/घट दरानुसार फरकाची रक्कम अदा/वसूल करणे बंधनकारक राहील या अटीस अधिन राहून त्यांचेबरोबर करार करण्यास मान्यता मिळणेबाबत मा.अति.महा.आयुक्त(वि) यांचे क्र.मआ/पथ/१२९८ दि. २७/२/२००८ चे पत्र.

**विषय क्र. १९५७**

फॅब्रीकेटींग सप्लायींग ॲण्ड इरेक्ट्रींग स्ट्रीट फर्निचर ऑन प्रभात रोड, भांडारकर रोड, सेनापती बापट मार्ग, भाऊपाटील रोड आणि चिपळूणकर रोड कामी टेंडर्स मागविली असता आलेल्या ३ टेंडसपैकी ठेकेदार मे.राजेश एंटरप्रायजेस यांचे टेंडर सर्वात कमी रक्कमेचे (टेंडर र.रुपये १,००,००,०००/–) असल्याने त्यांचेकडून र.रुपये १,५२,५९,००२/– पर्यंत काम करुन घेण्यासाठी त्यांचेबरोबर करार करण्यास मान्यता मिळणेबाबत मा.अति.महा.आयुक्त(वि) यांचे क्र.मआ/पथ/१२९९ दि. २७/२/२००८ चे पत्र.

**विषय क्र. १९५८**

कोंढवा मुख्य रस्ता सी.सी.रोड करणे तसेच ग्राऊट व डांबरीकरण करणे कामी टेंडर्स मागविली असता ठेकेदार अे.आर.कन्स्ट्रक्शन यांचे एकच टेंडर (टेंडर र.रु. ८०,३३,६००/– पेक्षा २७.२७% जास्त) आले असल्याने त्यांचेकडून र.रुपये १,०२,२४,३६२=७२ पर्यंत काम करुन घेणेस तसेच डांबर, सिमेंट, लोखंड या तिन्ही मटेरियलचे निर्धारित केलेल्या बेसिक दरामध्ये कंत्राट कालावधीमध्ये वाढ/घट दरानुसार फरकाची रक्कम अदा/वसूल करणे बंधनकारक राहील या अटीस अधिन राहून त्यांचेबरोबर करार करण्यास मान्यता मिळणेबाबत मा.महा.आयुक्त यांचे क्र.मआ/पथ/१३०० दि. २७/२/२००८ चे पत्र.

**विषय क्र. १९५९**

पुणे जिल्हा हौशी ॲथलेटिक्स संघटनेने महाराष्ट्र हौशी ॲथलेटिक संघटना व आशियाई ॲथलेटिक महासंघटना यांच्या विद्यमाने २७ जून २००७ रोजी आयोजित केलेल्या आशियाई ग्रां.प्रि.मैदानी स्पर्धेच्या खर्चाची बिले अदा करण्यासाठी मा.संयोजन सचिव, आशियाई ग्रां.प्रि.मैदानी स्पर्धा, पुणे २००७ यांचे नावे रक्कम रुपये १०,००,०००/– (रुपये दहा लाख फक्त) चेक काढण्यास, सदर बिल खालील बजेटहेडवर खर्ची टाकण्यास व त्यांना अदा करण्यास मान्यता मिळणेबाबत मा.नगरसचिव यांचे क्र. ७५२९ दि. २८/२/२००८ चे पत्र.

सन २००७–०८ चे अंदाजपत्रक, १.मुख्य देखरेख वसुली वगैरे, क.मनपा नि स्थायी समिती, १.नगरसचिव यांचे कार्यालय, ५२.एशियन ग्रां.प्रि.तरतुद र.रुपये १० लाख.

UnRegistered

**विषय क्र. १९६०**

वॉर्ड क्र. ९४ तुकाई टेकडी येथे ४० लक्ष लिटर्स क्षमतेची पाण्याची टाकी बांधणे कामी टेंडर्स मागविली असता मे.अरिहंत कन्स्ट्रक्शन यांचे एकच टेंडर आले (टेंडर र.रु. १,००,८२,८७३/- पेक्षा २७% जास्त) असल्याने त्यांचेकडून र.रुपये १,२८,०५,२४८=७१ पर्यंत अधिक भाववाढ सूत्रानुसार होणाऱ्या रकमेपर्यंत काम करुन घेण्यासाठी त्यांचेबरोबर करार करण्यास मान्यता मिळणेबाबत मा.महा.आयुक्त यांचे क्र.मआ/पापु/प्र/१३०२ दि. २८/२/२००८ चे पत्र.

**विषय क्र. १९६१**

होळकर जलशुध्दीकरण केंद्र येथे ५० द.ल.लि. प्रतिदिन क्षमतेचे फिल्टर हाऊस, रिसर्क्युलेशन संप व पंपहाऊस बांधणे व अनुषंगिक कामे करणे कामी टेंडर्स मागविली असता आलेल्या ४ टेंडसपैकी ठेकेदार मे.जी.डी.खानदेशे यांचे टेंडर सर्वात कमी रक्कमेचे (टेंडर र.रु. ६,८०,४१,९४१/- पेक्षा २१.६०% जास्त) असल्याने त्यांचेकडून र.रुपये ८,२७,३९,०००=२६ पर्यंत काम करुन घेण्यासाठी त्यांचेबरोबर करार करण्यास मान्यता मिळणेबाबत मा.महा.आयुक्त यांचे क्र.मआ/पापु/प्र/१३०३ दि. २८/२/२००८ चे पत्र.

**विषय क्र. १९६२**

जवाहरलाल नेहरु राष्ट्रीय शहरी पुर्नरुथान अभियानाअंतर्गत झोपडपट्टी पुनर्वसन योजनेच्या प्रस्तावाबाबत हडपसर पॅकेज व्यतिरिक्त इतर सर्व ठिकाणी व पार्किंग + ७ मजली इमारतींचे काम करण्यास व कोथरुड, हिंगणे, वारजे येथील (पॅकेज ३) या कामातून सिंहगड रोडवरील टी.पी.स्किम क्र. ३, फायनल प्लॉट नं. ५४५, प्लॉट नं. ३७ येथे पी+७ इमारती बांधण्यास व टेंडर अटी, शर्तीप्रमाणे काम करण्यास मान्यता मिळणेबाबत मा.महा.आयुक्त यांचे क्र.मआ/जनेयो/क्र.२/१३०४ दि. २८/२/२००८ चे पत्र.

लिफ्ट व जनरेटरचा खर्च वेगळा करण्यात यावा. याबाबत नविन कोणतीही दरवाढ देण्यात येवू नये.

**विषय क्र. १९६३**

मा.सौ.स्वाती मोरे व मा.राजेंद्र काची यांचे दि. २७/२/२००८ चे पत्र.

कु.श्रीप्रसाद अनंत हरपुडे, रा. ७१८/१३अ नवी पेठ हा सध्या पद्मश्री डॉ.विठ्ठलराव विखे पाटील सैनिक स्कूल, प्रवरानगर येथे इयत्ता ११ वी सायन्समध्ये शिकत असून या शाळेतून राष्ट्रीय टेबलसॉकर या स्पर्धेसाठी चंदिगड येथे त्याची निवड झाली होती व त्याठिकाणी यशस्वीरित्या खेळला आहे. त्याची आंतरराष्ट्रीय स्पर्धेसाठी मॉस्को (रशिया) येथे दि. २३ मार्च ते २९ मार्च २००८ साठी निवड झालेली आहे. सदर स्पर्धेसाठी त्यास र.रुपये २ लाख खर्च येणार आहे. त्यातील निम्मा खर्च भारतीय क्रिडा प्रबोधिनी (र.रुपये १ लाख) करणार आहे.

कु.श्रीप्रसाद यास उर्वरित रकमेची गरज आहे. तरी पुणे महानगरपालिकेचे वतीने श्रीप्रसाद यास र.रुपये १ लाख अर्थसहाय्य स्पर्धेसाठी देण्यास मान्यता द्यावी.

**विषय क्र. १९६४**

मा.अरुण धिमधिमे, मा.आबा बागुल, मा.संदिप लडकत, मा.राजेंद काची, मा.दिलिप उंबरकर, मा.सौ.कमल व्यवहारे, मा.सुनिल कांबळे व मा.दिपक मानकर यांचे दि. २८/२/२००८ चे पत्र.

पुणे शहरातील झोपडपट्ट्या गरीब वस्त्यामध्येही बालक व महिलांचे आरोग्य जपण्याचे काम अंगणवाडी सेविका मदतनीस करतात तसेच ३ ते ६ वयोगटातील बालकांना अक्षर, अंक ओळख, खेळ अंगणवाड्यांमार्फत होतात. आरोग्य खात्याकडून घेतले जाणाऱ्या लसीकरण, पल्स पोलिओ इत्यादी पुणे मनपा योजनांचा मोहिमांचा कणा असणाऱ्या सेविका मदतनीस या स्वत: मात्र मानधनावर हे काम करतात. दुसऱ्याच्या आरोग्याची काळजी घेणाऱ्या अंगणवाडी आयांच्या स्वत:च्या आरोग्यासाठी कसलीही योजना नाही म्हणून पुणे मनपा हद्दीतील जवळपास दीड हजार (१५००) अंगणवाडी सेविका मदतनीस यांना गंभीर आजारावर ५०,०००/- पर्यंतचे मोफत उपचार करण्यासाठी पुणे मनपा अंदाजपत्रकात २००८-०९ मध्ये निर्णय घेण्यात येत आहे. पुणे मनपा हद्दीअंतर्गत येणाऱ्या (६) सहा पूर्ण व दापोडी, बोपोडी अर्ध्या प्रकल्पातील अंगणवाडी आयांना ही योजना लागू होईल. त्याकरीता पुणे मनपाकडे र.रुपये १००/- प्रत्येकी नोंदणी (नाममात्र) फी या आयांना भरावे लागतील. क्षेत्रिय आरोग्य अधिकारी

Unregistered

यांनी शिफारस केल्यावर वैद्यकिय सहाय्य योजनेच्या मान्यताप्राप्त इस्पितळात गंभीर आजारासाठी प्रत्येकी रुपये ५०,०००/– पर्यंतचे उपचार मोफत होतील.

तरी त्याकरीता आरोग्य खात्याकडे र.रुपये १ कोटीची एकवट तरतूद सन २००८–०९ च्या अंदाजपत्रकात करण्यास मान्यता देण्यात यावी.

**विषय क्र. १९६५**

मा.दिलीप उंबरकर व मा.सुनिल कांबळे यांचे दि. २८/२/२००८ चे पत्र.

मा.विरोधी पक्षनेते यांच्याकरीता असणारी ऐच्छिक निधी संपली असल्याने तसेच पुढील काळासाठी ऐच्छिक खर्च बिले अदा करणेसाठी र.रुपये २५ हजार ऐच्छिक निधी मंजूर करण्यास व त्यासाठी वर्गीकरण करण्यास मान्यता देण्यात यावी.

**विषय क्र. १९६६**

पुणे–नगर रस्ता येथे रामवाडी जकात नाका चौकात वाहनांकरीता भुयारी मार्ग व अन्य ठिकाणी पादचारी भुयारी मार्गाची बांधणी करणे व तदनुषंगिक कामे करणे कामी टेंडर्स मागविली असता आलेल्या ४ टेंडसपैकी ठेकेदार मे.डब्ल्यू.एस.कन्स्ट्रक्शन्स यांचे टेंडर सर्वात कमी रक्कमेचे (टेंडर र.रु. ६,९५,१५,१८२/– पेक्षा २७% जास्त) असल्याने त्यांचेकडून र.रुपये ८,८२,८४,२८१=१४ पर्यंत काम करुन घेण्यासाठी अधिक डांबर, स्टील, सिमेंट बाजारभावानुसार फरक व उर्वरित माल मटेरियलसाठी भाववाढ सुत्रानुसार फरक अदा करण्यास व त्यांचेबरोबर करार करण्यास मान्यता मिळणेबाबत मा.महा.आयुक्त यांचे क्र.मआ/जनेयो/१३०६ दि. २८/२/२००८ चे पत्र.

**सुनिल पारखी**
**उपनगरसचिव,**
**पुणे महानगरपालिका.**

UnRegistered